
सोमवार, २८ फेब्रुवारी २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक २२२
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड


## ...तोपर्यंत उपोषण मागे घेणार नाही -संभाजीराजे



**मुंबई** : माझे उपोषण हे स्वतःसाठी नाही, तर गरीब मराठ्यांना न्याय मिळावा म्हणून आहे. त्यामुळे जोपर्यंत राज्य सरकारकडून लेखी आश्वासन मिळणार नाही तोपर्यंत उपोषण मागे घेणार नाही, अशी ठाम भूमिका आमरण उपोषणास बसलेले खासदार संभाजीराजे भोसले यांनी घेतली आहे. उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी रविवारी (दि. २७) राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी आझाद मैदानात जाऊन संभाजीराजे यांची भेट घेतली. सुमारे अर्धा तासाच्या या चर्चेनंतर संभाजीराजे यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, गृहमंत्री लक्ष घालतो म्हणाले आहेत. ते मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेणार आहेत, मात्र लेखी आश्वासन मिळेपर्यंत आमरण उपोषण मागे घेणार नाही, हे मी त्यांना स्पष्ट सांगितले आहे.

## अंतरंग

भाजपच्या पाठपुराव्यामुळे प्रकल्पग्रस्तांची घरे नियमित/३
सिडको हद्दीत सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन/५
आजपासून भिवंडीत राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा/६






## मराठा आरक्षणावरून विनायक मेटे यांची टीका

# मविआ सरकार गंभीर नाही



**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाचा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित झाला आहे. तिकडे मुंबईमध्ये छत्रपती संभाजीराजे आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषण करत आहेत. तर दुसरीकडे शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष विनायक मेटे यांनी आघाडी सरकारवर निशाणा साधला आहे. मराठा आरक्षणावर आघाडी सरकार गंभीर नाही. आरक्षण रद्द झाल्यानंतर सरकारने मराठा समाजाबाबत कोणताही निर्णय घेतलेला नाही. मराठा समाजाचा वापर केवळ सत्ता मिळविण्यासाठी खतासारखा केला जात असल्याचा आरोप विनायक मेटे यांनी केला आहे.

मराठा आरक्षणावर हे महाविकास आघाडी सरकार गंभीर नाही. हे वारंवार स्पष्ट होताना आपल्याला दिसतेय. मराठा समजाचे आरक्षण रद्द झाल्यानंतर या सरकारने एकही निर्णय, एकही गोष्ट मराठा समाजासाठी केलेली नाही ही वस्तूस्थिती आहे, असे विनायक मेटे म्हणाले आहेत. यासोबतच जे जे या चळवळीत आरक्षणासाठी आंदोलन करतात, त्या सगळ्यांबरोबर बोलणे चर्चा करणे, यादेखील साध्या प्राथमिक गोष्टी हे सरकार करत नाही. मराठा यांना काही देणेघेणे नाही. फक्त सत्ता मिळवण्यासाठी खतासारखा उपयोग हे सरकार मराठा समाजाचा करतय, हे आपल्या चित्र दिसतय, असा आरोपही विनायक मेटे यांनी महाविकास आघाडी सरकारवर केला आहे.

## आठवणीतलं पनवेल पुस्तकाचे प्रकाशन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्व. एस. आर. जोशी स्मृतिदिनानिमित्त अ‍ॅड. सुनीता जोशी संपादित आठवणीतलं पनवेल या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात शनिवारी (दि. २६) झाला. या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. गिरीश गुणे यांच्या हस्ते आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत झाले.

स्व. एस. आर. जोशी मेमोरियल या ट्रस्टमार्फत आठवणीतलं पनवेल या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा शनिवारी झाला. या ट्रस्टतर्फे गेली अनेक वर्षे सामाजिक बांधिलकी जपून पनवेल परिसरात सेवाभावी कार्य केले जात आहे. या कार्यक्रमाची सुरुवात स्वराली संगीत विद्यालयाच्या बालकलाकार मंडळींनी पोवाडा सादर करून केली.

या कार्यक्रमाला महापौर डॉ. कविता चौतमोल, नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, भाजप जिल्हा सरचिटणीस श्रीनंद पटवर्धन, प्रकाशक अशोकसाई खरात, ज्येष्ठ सहकारी दत्तात्रय जाधव, सुनील देसाई, डॉ. भक्तीकुमार दवे, डॉ. संजीवनी गुणे, पुस्तकाच्या संपादिका अ‍ॅड. सुनीता जोशी, उज्ज्वला पटवर्धन, ट्रस्टी माधवराव जोशी, संतोष घोडींदे, गौरीताई बापट, अत्रे आदी उपस्थित होते.



## काँग्रेसला मोठा झटका!

### गुलाम नबी आझाद यांच्या पुतण्याचा भाजपमध्ये प्रवेश

**श्रीनगर : वृत्तसंस्था**

काँग्रेसला मोठा झटका बसला आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते गुलाम नबी आझाद यांचे पुतणे मुबशीर आझाद यांनी रविवारी (दि. २७) भाजपमध्ये प्रवेश केला. गुलाम नबी आझाद यांचे धाकटे भाऊ लियाकत अली



यांचा मुलगा मुबशीर यांनी पक्ष सोडताना काँग्रेसवर जोरदार टीका केली. काँग्रेसने माझे काका आझाद यांचा नेहमी अपमान केला असे ते म्हणाले.

मुबशीर यांनी या वेळी नरेंद्र मोदींचे कौतुकही केले. मुबशीर आझाद आणि त्यांच्या समर्थकांनी भाजपच्या जम्मू आणि काश्मीर युनिटचे अध्यक्ष रविंदर रैना आणि माजी आमदार दलीप सिंग परिहार यांच्यासह वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत पक्षात प्रवेश केला.

मुबशीर आझाद म्हणाले, काँग्रेस पक्ष आपापसात भांडण करण्यात गुंतला आहे. काँग्रेसने माजे काका माजी मुख्यमंत्री गुलाम नबी आझाद यांचा नेहमी अपमान केला आहे.

## श्रीसदस्यांकडून पनवेलमध्ये स्वच्छता अभियान





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रभुषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त पनवेल तालुक्यात स्वच्छता अभियानाचे आयोजन रविवारी (दि. २७) करण्यात आले होते. या अभियानाला पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत कौतुक केले.

पनवेलमधील महाराष्ट्रभूषण नानासाहेब धर्माधिकारी उड्डाणपूलावर तसेच सर्व शासकीय कार्यालयांसमोर श्रीसदस्यांच्या माध्यमातून स्वचछता अभियान राबवण्यात आले.

ज्येष्ठ निरुपणकार पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. या अभियानात साडेचार हजारांहून अधिक श्रीसदस्यांनी सहभाग घेऊन परिसर स्वच्छ केला तसेच सुमारे ११० टन कचरा या वेळी गोळा करण्यात आला.

## कर्जत आदिवासी महिला मारहाण प्रकरण

# आरोपीच्या अटकेसाठी संघटनेकडून आज मोर्चा

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील ताडवाडी येथे आदिवासी महिलेवर प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यात त्या रक्तबंबाळ झाल्या होत्या. पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल झाली आहे, मात्र या प्रकरणातील मुख्य सूत्रधार तसेच आरोपी यांना अद्याप अटक झालेली नाही. त्यामुळे आदिवासी संघटना आक्रमक झाली आहे.

या प्रकरणातील मुख्य सूत्रधार याला अटक करावी तसेच आदिवासींवरील अत्याचाराच्या उन्नती सामाजिक संस्थेकडून पोलीस उपविभागीय अधिकारी कर्जत यांच्या कार्यालयावर सोमवारी (दि. २८) मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.



बिगर आदिवासी कृष्णकुमार ठाकूर यांनी सर्व नियम धाब्यावर बसवून शेतकरी आदिवासी असल्याचा गैरफायदा घेत विवादित जागेवर काम सुरू केले. आपल्या जागेवर काम सुरू असल्याचे समजताच तुळसीबाई अनंता खंडवी व इतर आदिवासी महिला या काम थांबवायला गेल्या होत्या, मात्र तेथील मिळकतीचे मुख्य भोगवटादार कृष्णकुमार ठाकूर त्याचे कामगार अमोल पाटील, गणेश गोविंद घोडविंदे पाच सहकारी यांनी आदिवासी महिलावर जिवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात त्या महिला पूर्णपणे रक्तबंबाळ झाल्या होत्या. पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल होऊन अमोल पाटील व इतरांवर गुन्हे दाखल झाले, मात्र या घटनेचा मुख्य सूत्रधार कृष्ण कुमार ठाकूर यांच्यावर गुन्हा दाखल झालेला नाही तसेच गुन्हेगार अद्याप मोकाट असल्याने पोलीस खात्याकडून त्यांना पाठीशी घातले जात असल्याचा आरोप आदिवासी संघटनेने केला आहे. त्यामुळे या गोष्टीचा निषेध व्यक्त करण्यासाठी आदिवासी ठाकूर उन्नती सामाजिक संस्थेकडून मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

कर्जत तालुक्यातील आदिवासी ठाकूर-कातकरी, महादेव कोळी तसेच समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन कर्जत तालुका आदिवासी संघटनेने केले आहे. हा मोर्चा सकाळी रॉयल गार्डन मुद्रे कर्जत येथून निघणार आहे. जो पर्यंत मागण्या मान्य होत न्याय मिळत नाही तोपर्यंत माघार घेणार नसल्याची भूमिका संघटनेने घेतली असल्याचे अध्यक्ष भरत शीद यांनी केले आहे.

## मन की बात कार्यक्रमाला भाजप कार्यकर्त्यांचा प्रतिसाद

**खोपोली : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मन की बात या कार्यक्रमाला खोपोलीत कार्यकर्त्यांचा चांगला प्रतिसाद लाभला. कमलाबेन शहा सभागृहात मोठ्या पडद्यावर स्लाईड शोद्वारे पंतप्रधान मोदींचे विचार ऐकण्यासाठी नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

भाजप महिला मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, भटके विमुक्त जमाती महिला सेलच्या जिल्हाध्यक्ष विद्या तामखडे, भाजप जिल्हा सरचिटणीस दीपक बेहरे, खोपोली संपर्कप्रमुख व प्रभारी सुनील घरत, शहर अध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, सरचिटणीस हेमंत नांदे, सहचिटणीस प्रमोद पिंगळे, गोपाळ बावस्कर, माजी अध्यक्ष विजय तेंडुलकर डिलीप निंबाळकर, माजी नगराध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते सोहनराज राठोड, माजी नगरसेविका अनिता शहा, सुनिती महर्शि, त्याचप्रमाणे विविध सेलचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, या कार्यक्रमानंतर त्याच ठिकाणी आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांच्या समस्या पदाधिकार्यांनी जाणून त्यावर चर्चा केली. या वेळी जिल्हा सरचिटणीस दीपक बेहरे यांनी मार्गदर्शन केले. स्नेह भोजनानंतर कार्यक्रम समाप्त झाला.



(छाया : विनायक माडपे)

## माणगावमधील मृतदेहाचे गूढ उकलले; पत्नीच्या अनैतिक संबंधातून खून

### आरोपी अटकेत

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहराच्या मध्यभागी असलेल्या कालव्यामध्ये शुक्रवारी आढळलेल्या एका ३६ वर्षीय व्यक्तीच्या मृत्युचे गूढ उकलले असुन मयताच्या पत्नीच्या अनैतिक संबंधातून पत्नीच्या प्रियकरानेच त्याचा खून केला. माणगाव पोलिसांनी या प्रकरणी संशयित आरोपी संदीप गायकवाड (रा. उतखोलवाडी) याला अटक केली आहे.

सविस्तर वृत्त असे की, वाकडाई मंदिराकडे जाणाऱ्या उतेखोल गावच्या पुलाखालील परिसरात २५ फेब्रुवारी रोजी एक पुरुष जातीचा मृतदेह तरंगत वाहून जाताना नागरिकांनी पाहिला. माणगाव पोलिसांनी घटनास्थळी जाऊन मृतदेहाची ओळख पटवून घेतली. मृतदेह हा माणगावमधील महेंद्र भरत जाधव (वय ३६, रा. साईनगर) याचा असल्याचे उघड झाले. संशयित आरोपी संदीप नामदेव गायकवाड याला महेंद्र त्याच्या पत्नीसोबत असलेल्या अनैतिक संबधाबाबत वेळोवेळी समजविण्याचा प्रयत्न करीत होते. त्याचाच राग धरून संदीपने महेंद्रला कालव्याच्या पाण्यात ढकलून जीवे ठार मारले असा संशय आहे, म्हणून माणगाव पोलीस ठाणे येथे ४३/२०२२ भा. दं. वि. सं. क. ३०२ प्रमाणे नोंद करण्यात आला आहे. त्यानुसार संशयित आरोपीला अटक करण्यात आली, असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## माजगावात सरपंचाकडून 'सुकन्या समृद्धी'



**खोपोली, मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद शाळेच्या माजगाव येथे सुकन्या समृद्धी योजनेबाबतचा कार्यकम हाती घेण्यात आला. या वेळी मुलींच्या माता उपस्थित होत्या. ग्रुप ग्रामपंचायत माजगावचे भाजपचे सरपंच गोपीनाथ जाधव यांनी सुकन्या समृद्धी योजनांतून खाते खोलून पहिल्या हप्ताचे पैसे त्यांनी स्वत: भरले.

या वेळी गोपीनाथ जाधव म्हणाले की, २६ फेब्रुवारी, भारतीय डाक विभाग सुकन्या समृद्धी योजनांतून मुलीचे भविष्य समृध्द होत असून, प्रत्येक पालक वर्गांनी आपल्या मुलीचे खाते खोलून तिच्या भाविष्यांसाठी तर्तुद करून ठेवा. आपल्याला शक्य होईल असे पैसे जमा करीत जा, आज ५० खाते लहान मुलींचे माझ्या माध्यमातून होत असतांना मला मनस्वी आनंद होत आहे, कारण मुलीचे आशीर्वाद माझ्यासाठी बहुमुल्य आहे.

या वेळी सुकन्या समृद्धी योजनेची माहिती देण्यासाठी सहाय्यक अधिक्षक डाक घर नवी मुंबई विभाग पनवेलचे जनावडे उपस्थित होते. त्यांनी आता मुलींच्या नावे खाते काढल्यांने भविष्यात शिक्षण आणी लग्नाचा खर्चासाठी आपल्याला खूप मोठी मदत होईल, अशा शब्दांत या योजनेची माहिती सांगितली. त्याचबरोबर ग्रामीण डाक सेवा अशोक खोपडे, जी.डी.एस खालापूर अविनाश खंडागळे यांनीसुद्धा असे मनोगत व्यक्त केले.

पोस्टमन संदीप गायकवाड, ग्रामसेवक संदीप धारणे, शिक्षिका अंजली विचारे, नंदा पाचपिंडे, रेखा जाधव, सदस्य कल्पना वाघे, ग्रामस्थ नामदेव वाघे, वसंत कांबळे आदी उपस्थित होते.

## खोपोलीत रक्तदान शिबिर

### भाजप नेत्यांनी दिली सदिच्छा भेट

**खोपोली : प्रतिनिधी**

कै. लक्ष्मण साबळे यांच्या स्मरणार्थ रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी भाजप नेत्यांनी व पदाधिकाऱ्यांनी सदिच्छा भेट दिली.

खोपोली भाजप संपर्क प्रमुख सूनील घरत, भाजप भटके विमुक्त जमाती महिला सेलच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष विद्या तामखडे, खोपोली भाजप सरचिटणीस हेमंत नांदे, उत्तर रायगड जिल्हा कामगार आघाडीचे सहसंयोजक सूर्यकांत देशमुख, उपाध्यक्ष चन्द्रप्पा अनिवार, युवा मोर्चा अध्यक्ष अजय इंगुलकर उपस्थित होते. या वेळी साबळे परिवारातर्फे यशवंत साबळे यांनी उपस्थित नेत्यांचे स्वागत केले.



## म्हसळ्यात बालविवाह रोखला

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा तालुक्यातील लेप येथील घटनेतून म्हसळा पोलिसांनी बालविवाहीत मुलीचे वडील (वय ४०, रा. मढेगाव, आदिवासी वाडी) व सासरा (वय ४२, रा. लेप, आदिवासी वाडी) यांना अटक केल्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उध्दव सुर्वे यांनी सांगितले.

माणगाव उपजिल्हा रुग्णालय येथे लेप आदीवासीवाडीवरील विवाहीत महिला डिलेव्हरीसाठी गेली असता आधार कार्डावरील नोंदीनुसार महिला अल्पवयीन (वय १७) असल्याचे लक्षात आले. या वेळी प्रथम माणगाव, नंतर गोरेगाव पोलीस स्टेशनला कळविण्यात आले. या घटनेत मुलीचा विवाह मढेगाव (ता. माणगाव) येथे कोरोना कालावधीत झाला. विवाहीत मुलगा व मुलगी दोघेही अज्ञान असल्याची माहिती मिळाली.

बालविवाह उघडकीस आल्यानंतरही गुन्हे, नोंदविण्यात कुचराई होते. विशेष म्हणजे गुन्हा कुणी दाखल करावा म्हणून यंत्रणेमध्ये एकमेकांना पत्र पाठवली जातात. यामध्ये उपजिल्हा रुगणालय माणगाव येथील वैद्यकीय अधीक्षक अगर अधिकाऱ्याने माणगावमध्ये गुन्हा नोंदवून तो म्हसळा पोलीस स्टेशनला वर्ग होणे जरुरीचे होते. या प्रकारामुळे या यंत्रणेलाही प्रशिक्षणाची गरज आहे, असे म्हसळा पंचायत समितीचे माजी सभापती महादेव पाटील यांनी सांगितले.

## जुम्मापट्टीतील मोकाट माकडे जेरबंद

**कर्जत : बातमीदार**

माकडांचे खेळ करणाऱ्या डोंबाऱ्यांनी २०२१च्या पावसाळ्यात जुम्मापट्टी शाळेच्या परिसरात चार माकडे आणून सोडली होती. ती माकडे दररोज कोणाच्यातरी अंगावर धडप घालत असत. एका माकडाने तेथील जिल्हा परिषद शाळेत घुसून सहा वर्षांच्या विद्यार्थिनीला चावा घेतला होता. त्यामुळे वन विभागाने स्थानिकांच्या मागणीनुसार माकड पकडणाऱ्या टीमला पाचारण केले आहे. त्या मंकी कॅचर टीमने रविवारी (दि. २७) चार पैकी तीन माकडांना पिंजऱ्यात जेरबंद केले.

मुंबई येथील मंकी कॅचर टीमकडून संपूर्ण ऑपरेशन सुरू असताना वन विभागाचे वनक्षेत्रपाल उमेश जंगम, वनपाल सुहास म्हात्रे, तसेच वनरक्षक भूषण साळुंखे, ज्ञानेश्वर माळी




यांच्यासह शाळेच्या मुख्याध्यापिका गीता पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नरेंद्र पारधी, स्थानिक ग्रामस्थ सुनील पारधी, जैतू पारधी, गणेश पारधी आदी उपस्थित होते.

## दक्षिण मुंबईतील वीजपुरवठा महापारेषणने केला पूर्ववत

**मुंबई : प्रतिनिधी**

तांत्रिक बिघाडामुळे रविवारी (दि.२७) दक्षिण मुंबईतील खंडित झालेला वीजपुरवठा महापारेषणच्या प्रयत्नांमुळे तत्काळ पूर्ववत करण्यात आला.

ट्रॉम्बे येथील मुख्य ग्रहण केंद्रामधून दक्षिण मुंबईत वीजपुरवठा करण्यात येतो. रविवारी नियोजित कामासाठी वीजपुरवठा बंद करण्यात आला होता. सकाळी आठ वाजून ४४ मिनिटांनी मुलुंड-ट्रॉम्बे ही वाहिनी तांत्रिक बिघाडामुळे बंद पडली. त्याचवेळी सकाळी नऊ वाजून ४९ मिनिटांनी भाभा अणु संशोधन केंद्राच्या परिसरातील जंगलात आग लागली. त्यामुळे २२० के. व्ही. क्षमतेची कळवा-ट्रॉम्बे ही वीजवाहिनी तांत्रिक बिघाडामुळे बंद पडली. त्याचा परिणाम ट्रॉम्बे-सॉल्सेट वाहिनीवर झाला. भार वाढल्यामुळे ही वीजवाहिनीही बंद पडली. त्यामुळे ट्रॉम्बे वीजनिर्मिती केंद्रावर अतिरिक्त भार आला. परिणामी, वीजनिर्मिती संच बंद पडले. या तांत्रिक बिघाडामुळे दक्षिण मुंबई (कुलाबा, महालक्ष्मी आणि दादर) परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला होता. महापारेषणच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे वीजपुरवठा पूर्ववत झाला.

प्रधान सचिव (ऊर्जा) तथा महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दिनेश वाघमारे यांनी तातडीने ट्रॉम्बे येथील केंद्राला भेट दिली. त्यांनी वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी अधिकारी, कर्मचारी यांना मार्गदर्शन केले. या वेळी संचालक (संचलन) अनिल कोलप, संचालक (प्रकल्प) नसीर कादरी, वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता महेंद्र वाळके, राज्य भार प्रेषण केंद्राच्या मुख्य अभियंता जुईली वाघ, अधीक्षक अभियंता पीयूष शर्मा उपस्थित होते.

सोमवार, २८ फेब्रुवारी २०२२

राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक २२२
www.ramprahar.com

◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## भाजपच्या पाठपुराव्यामुळे नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांची गरजेपोटी घरे नियमित

**नवी मुंबई** : भाजपच्या प्रयत्न व पाठपुराव्यामुळे नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्याचा निर्णय राज्याच्या नगरविकास विभागाने घेतला असून तसा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. सानपाडा येथे रविवारी (दि. २७) पत्रकार परिषदेत नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांनी या निर्णयाची माहिती दिली. १९७०च्या दशकात मुंबईला लागून नवी मुंबई उभारण्यासाठी सिडकोने प्रकल्पग्रस्तांची जमीन अल्प दराने संपादित केली होती. १९९० साली साडेबारा टक्के योजना आली, मात्र प्रकल्पग्रस्तांच्या समस्या कायम राहिल्या. दरम्यान, प्रकल्पग्रस्तांनी नैसर्गिक गरजेपोटी घरे बांधली. प्रकल्पग्रस्तांच्या न्याय्य हक्कांसाठी लोकनेते (स्व.) दि. बा पाटील यांनी अखेरपर्यंत लढा दिला. त्यानंतर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे, आमदार महेश बालदी यांनी प्रकल्पग्रस्तांची बाजू सातत्याने लावून धरली होती. अखेर त्यास यश आले आहे. दरम्यान, आता नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला सरकारने दिवंगत लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देऊन त्यांचा उचित सन्मान करावा, अशी मागणी भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्तांमधून होत आहे.

# एक भारत-श्रेष्ठ भारत अनुभवूया!

## पंतप्रधान नरेंद्र मोदींची 'मन की बात'

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि. २७) त्यांच्या मन की बात कार्यक्रमाद्वारे देशवासीयांना संबोधित केले. या वेळी त्यांनी सोशल मीडिया स्टार टांझानियाच्या किली पॉल आणि निमा पॉल या भावंडांचा उल्लेख केला. जर टांझानियात भारताची गाणी अशा प्रकारे लिप सिंक करू शकतात, तर माझ्या देशात अनेक भाषांमध्ये असंख्य प्रकारची गाणी आहेत. गुजराती मुले तमिळ गाण्यांवर व्हिडिओ बनवू शकतात. केरळची मुले आसामी गाण्यावर, तर कन्नडच्या मुलांनी जम्मू-काश्मीरच्या गाण्यांवर व्हिडीओ बनवावे. यातून 'एक भारत-श्रेष्ठ भारत' अनुभवता येईल असे वातावरण आपण निर्माण करू शकतो, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

पंतप्रधान मोदींनी टांझानियातील दोन्ही भावा-बहिणींचे कौतुक केले. ते म्हणाले, भारतीय संस्कृती आणि माझ्या परंपरेबद्दल बोलताना, आज मला तुमची दोन लोकांशी ओळख करून द्यायची आहे. आजकाल टांझानियन भावंडे किली पॉल आणि निमा पॉल सोशल मीडियावर खूप चर्चेत आहेत. तुम्हीही त्यांच्याबद्दल ऐकले असेल. मी या भाऊ आणि बहिणीचे त्यांच्या अद्‌भूत सर्जनशीलतेबद्दल मनापासून कौतुक करतो.

काही दिवसांपूर्वी भारतीय दूतावासानेही टांझानियाच्या या भाऊ-बहिणीचा गौरव केला होता. पंतप्रधान मोदींनी सांगितले की, आम्ही स्वातंत्र्याचा अमृतोत्सव नव्या पद्धतीने साजरा करू शकतो. मी तरुणांना आवाहन करतो की, त्यांनी यावे आणि भारतीय भाषांमधील लोकप्रिय गाण्यांचे त्यांच्या पद्धतीने व्हिडीओ बनवावे. तुम्ही खूप लोकप्रिय व्हाल. यामुळे देशातील विविधतेची ओळख नव्या पिढीला होईल.



**पनवेल : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मन की बात कार्यक्रम रविवारी झाला. भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी हा कार्यक्रम कामोठे मंडल कार्यालयाच्या सभागृहात टीव्हीवर अनुभवला. सोबत शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, शक्तीकेंद्र प्रमुख प्रदीप भगत, बूथ अध्यक्ष अजय मोरे, युवा नेते हॅप्पी सिंग यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते होते.**


**पनवेल : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या रविवारी 'मन की बात'च्या माध्यमातून देशवासीयांशी संवाद साधतात. भाजपच्या शहर व तालुका मध्यवर्ती कार्यालयात या कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपणाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप शहर सरचिटणीस अमरीश मोकल यांच्यासह पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.**



### पंतप्रधानांकडून मराठी भाषा दिनाच्या हार्दिक शुभेच्छा



*पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात'मध्ये मराठी भाषा गौरव दिनावर बोलताना सर्व मराठी नागरिकांना खास शुभेच्छा दिल्या. 'सर्व मराठी बंधू-भगिनींना मराठी भाषा दिनाच्या हार्दिक शुभेच्छा', असे म्हणत पंतप्रधान मोदींनी शुभेच्छा दिल्या.*



## आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या हस्ते व्यसनमुक्ती केंद्राचे उद्‌घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री हनुमान समाजसेवा प्रबोधिनी संस्थेच्या वतीने पनवेल तालुक्यातील चिंचपाडा येथे व्यसनमुक्ती केंद्र सुरू झाले आहे. या केंद्राचे उद्‌घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या हस्ते शनिवारी (दि. २६) झाले.

व्यसनमुक्ती केंद्राच्या उद्‌घाटन समारंभास कर्मयोगी संत दिलीपबाबा, भिक्खू कुलीणपुत्र वेरसभुजी स्थवीर, आर्या आम्रपाली माताजी, बाळाराम मुंडकर, रमेश मुंडकर, जितेंद्र मुंडकर, विजय मुंडकर, कमलाकर मुंडकर, शेखर मुंडकर, श्रीयश मुंडकर, निकेश मुंडकर, रूपेश मुंडकर, निलेश मुंडकर, योगेश मुंडकर, समित केणी, शशिकांत भोईर, माजी सरपंच रविकांत भोपी आदी उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंडकर कुटुंबीयांनी सुरू केलेल्या व्यसनमुक्ती केंद्राबद्दल त्यांचे कौतुक केले व या केंद्राच्या माध्यमातून मिळणाऱ्या मार्गदर्शनाचा फायदा तरुणांना निश्चित मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी ६ मार्चला पुणे दौऱ्यावर

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे शहरातील वाहतुकीचे वेगवान जाळे निर्माण करणाऱ्या महामेट्रोच्या उद्‌घाटनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी ६ मार्चला पुण्यात येणार आहेत.

या दौऱ्यात मेट्रोच्या फुगेवाडी ते पिंपरी आणि वनाज ते गरवारे महाविद्यालय या दोन टप्प्यांचे होणार उद्‌घाटन पंतप्रधान मोदींच्या हस्ते होणार आहे. यासह अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांचे उद्‌घाटन आणि भूमिपूजनही त्यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती महापौर मुरलीधर मोहोळ यांनी दिली.

पंतप्रधान मोदींचा हा दौरा आगामी महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असा मानला जात आहे. तो भाजप कार्यकर्त्यांना बळ देणारा ठरणार आहे. यापूर्वी गृहमंत्री अमित शाह यांनी पुण्याचा दौरा केला होता. त्यानंतर आता पंतप्रधान पुण्यात येणार असल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आहे.

## यूपीत मतदान केंद्राजवळ बॉम्बस्फोट



### एकाचा मृत्यू, एक जण जखमी

**प्रयागराज : वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशात पाचव्या टप्प्यातील मतदानादरम्यान रविवारी (दि. २७) भीषण घटना घडली. प्रयागराजमधील करेली येथे एका मतदान केंद्रापासून अवघ्या १० मीटर अंतरावर बॉम्बस्फोट झाला असून यात एक तरुण जागीच ठार, तर एक व्यक्ती जखमी झाला आहे.

प्रयागराज जिल्ह्याचे विशेष पोलीस अधीक्षक अजयकुमार यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, सायकलला लावलेल्या पिशवीत ही स्फोटके ठेवण्यात आली होती. पिशवी खाली पडल्याने स्फोट झाल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. संजय कोल आणि त्याचा चुलत भाऊ अर्जुन कोल हे दोघे या सायकलवर होते. स्फोटात यातील अर्जुन हा जागीच ठार झाला, तर संजय हा जखमी असून त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांकडून त्याची कसून चौकशी करण्यात येत आहे.

स्फोट झाला तिथून अवघ्या १० मीटर अंतरावरच मतदान केंद्र असल्याने पोलिसांकडून तो अँगल तपासण्यात येत आहे. ही स्फोटके या दोघांकडे नेमकी कशी आली. सायकलने ते नेमके कुठे चालले होते, याचाही पोलीस शोध घेत आहेत. स्फोटानंतर परिसरात बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

## निवडक

### युक्रेन-पोलंड सीमेवर भारतीय विद्यार्थ्यांना मारहाण

**किव्ह** : रशिया आणि युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर तेथे अडकलेल्या भारतीय विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे समोर आले आहे. युक्रेनमधून पोलंडमध्ये स्थलांतर करीत असताना भारतीय विद्यार्थ्यांना बेदम मारहाण झाली. याबाबत पीडित विद्यार्थ्यांनी त्यांना आलेले हृदयद्रावक अनुभव माध्यमांना सांगितले.

### टीम इंडियाच्या बसमध्ये काडतुसे आढळल्याने खळबळ

**चंदिगड** : टीम इंडिया विरुद्ध श्रीलंका टी-२० मालिकेनंतर उभय संघांमध्ये दोन कसोटी सामने होणार आहेत. यासाठी भारतीय कसोटी संघाचे खेळाडू चंदीगडला पोहचले आहेत. मोहालीतील स्टेडियमवर पहिला सामना खेळवला जाणार आहे. टीम इंडियाचे खेळाडू शनिवारी स्टेडियममध्ये सरावासाठी निघाले असताना बसची तपासणी करण्यात आली. त्या वेळी बसमध्ये दोन काडतुसे आढळली. त्यामुळे खळबळ उडाली आहे.





**पनवेल : कविश्रेष्ठ कुसुमाग्रज अर्थात वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस हा मराठी राजभाषा दिन म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनियर कॉलेजमध्ये साजरा करण्यात आला. यानिमित्त 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांनी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे, पीआरओ बाळासाहेब कारंडे, रायगड विभागीय कार्यालय प्रमुख संतोष गुजर उपस्थित होते.**

## भाजप युवा मोर्चाच्या शिलेदारांनी अनुभवला 'पावनखिंड'चा थरार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोरोना महामारीच्या कठीण काळातून सर्वजण सावरत असताना नव्या जोमाने संघटना बांधणी करून नागरिकांच्या सेवेसाठी तत्पर होण्याच्या दृष्टीने भाजप युवा मोर्चा पनवेल शहर मंडलच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सध्या चर्चेत असलेला 'पावनखिंड' हा सिनेमा एकत्र पाहिला. यातून या युवकांना एक वेगळीच ऊर्जा मिळाली.



हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी जी स्फुर्ती मावळ्यांमध्ये बाणवली होती त्याचा चित्रपटाच्या माध्यमातून एकत्रितरित्या अनुभव घेण्यासाठी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली युवा मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष रोहित जगताप यांनी शुक्रवारी (दि. २५) रात्री ८.३० वाजता ओरिअन मॉलमधील पीव्हीआर सिनेमागृहात एक स्क्रीन बुक केली होती. या वेळी महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप शहर अध्यक्ष जयंत पगडे, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील, नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, नगरसेविका चारूशीला घरत, दर्शना भोईर, रूचिता लोंढे, राजेश्री वावेकर, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, भाजप शहर सरचिटणीस अमरिश मोकल यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते आवर्जून उपस्थित होते.

विशेष म्हणजे 'पावनखिंड' चित्रपटात शिवा काशिद यांची भूमिका साकारणाऱ्या पनवेलमधील युवा अभिनेते अजिंक्य ननावरे यांची विशेष उपस्थिती होती. त्यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांचा संदेश स्क्रीनवरून प्रसारित करण्यात आला, तर सभागृह नेते परेश ठाकूर यांनीही युवकांना मार्गदर्शन केले. छत्रपती शिवराय, शूर बाजीप्रभू देशपांडे, मावळे यांच्यापासून प्रेरणा घेत सर्वजण घरी परतले.







पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**सोमवार, दि. २८ फेब्रुवारी २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल
३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
६. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर
७. सेंट्रल रेल्वे, पनवेल

**कोवॅक्सिन**

१. काळभैरव कार्यालय, कळंबोली (१५ आणि १८+)
२. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल
३. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल
४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर

## संपादकीय

# मराठा आरक्षणासाठी पुन्हा एल्गार

महाविकास आघाडी सरकारच्या निष्क्रिय आणि बेजबाबदार कारभारामुळे मराठा समाजाचे आरक्षणासह अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. त्यांना वाचा फोडण्यासाठी खासदार संभाजीराजे भोसले यांनी पुन्हा एकदा एल्गार पुकारला आहे. राज्य सरकारने आपला शब्द न पाळल्याने मुंबईतील आझाद मैदानात ते आमरण उपोषणाला बसले आहेत.

**महाराष्ट्रातील तीन पक्षांचे सरकार सत्तेवर आल्यापासून राज्यातील समस्या वाढत चालल्या आहेत. वास्तविक तीन पक्षांतील अनुभवी, ज्येष्ठ नेत्यांमुळे विविध प्रलंबित प्रश्न सुटणे अपेक्षित होते, पण कसले काय इथे सत्तेच्या साठमारीत त्यांना स्वत:चेच हित महत्त्वाचे वाटत असल्याने जनतेच्या भावनांकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले जात आहे. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मुद्द्यालाही अशीच बगल देऊन वेळ मारून नेण्याचे काम सुरू आहे. या सरकारच्या नियोजनशुन्यतेमुळेच मराठा समाजावर आरक्षण गमावण्याची वेळ आली. स्वाभाविकपणे सर्व बाबींची पूर्तता करून न्यायालयीन पातळीवर हे आरक्षण परत मिळवून देणे ही या सरकारची जबाबदारी आहे. ज्या जनतेच्या जीवावर आपण निवडून आलो त्यातील एक महत्त्वाचा घटक असलेल्या मराठा समाजाला त्यांचे आरक्षण पुन्हा मिळवून देण्यासाठी सरकारने पावले उचलणे गरजेचे होते, पण तशी त्यांची मानसिकता दिसून येत नाही. म्हणूनच खासदार संभाजीराजे आमरण उपोषणाला बसले आहेत. यापूर्वी मराठा समाजाने अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने मोर्चे काढून आपल्या मागण्या शासनदरबारी मांडल्या होत्या. त्यानंतर १५ दिवसांत समस्या मार्गी लावण्याचे आश्वासन गेल्या वर्षी जूनमध्ये सरकारकडून देण्यात आले होते. त्यावर मराठा समाजाकडून दोन महिन्यांची मुदत देण्यात आली होती, मात्र कार्यवाही काही झालेली नाही. सरकारने आपला शब्द न पाळता पुन्हा एकदा मराठाजनांच्या तोंडाला पाने पुसली. म्हणून हा समाज आता आक्रमक झाला असून त्यांचे प्रतिनिधीत्व करीत खासदार संभाजीराजे आमरण उपोषणाला बसले आहेत. तत्पूर्वी, धास्तावलेल्या सरकारने बैठक घेऊन संभाजीराजेंना उपोषणापासून परावृत्त करण्याचे प्रयत्न केले. मराठा आरक्षणासह इतर मागण्यांसाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी स्वतंत्र मागासवर्ग आयोगाची घोषणा केली, मात्र त्यावर संभाजीराजेंनी आक्षेप नोंदविला आहे. एक मागासवर्ग आयोग असताना केवळ मराठा समाजासाठी वेगळा आयोग तयार करता येतो का असा सवाल करून हे कायदेशीर नाही. समाजाची दिशाभूल करू नका, असा संतप्त इशारा संभाजीराजेंनी सरकारला दिला आहे. असे काही करण्याऐवजी तुमच्या हातात ज्या गोष्टी आहेत त्या करा, अशी मागणीही त्यांनी उपोषण सुरू करण्यापूर्वी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना केली. ती रास्त आहे, पण या सरकारला आरक्षण द्यायचेच दिसत नाही. या प्रश्नाचे घोंगडे भिजत ठेवून त्यावर आपली राजकीय पोळी भाजण्याचे काम मात्र सरकार चोखपणे करीत आहे. नवनवीन घोषणा, विधाने हे त्याचेच निदर्शक आहे, पण या सरकारने लक्षात ठेवावे की मराठा समाजाला लढवय्या इतिहास आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे पाईक असलेले मावळे एरवी शांत असतात, पण लढायच्या वेळी त्यांना सामना करताना पळता भुई थोडी होते. आरक्षणासह इतर मागण्यांसाठी आजवर मराठा समाजाने शांततेने आंदोलने केली, मात्र या समाजाचा अंत सरकारने पाहू नये. त्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी सरकारने ठोस पावले उचलणे आवश्यक आहे; अन्यथा संघर्ष अटळ आहे.**

# पत्रकारांना कायद्याने खरेच संरक्षण मिळते?

**खबरबात**
**संतोष पेरणे**

लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाला म्हणजेच पत्रकारांना संरक्षण देणारा कायदा केला गेलेला आहे, मात्र हा कायदा हा पत्रकारांवर हल्ला झाल्यानंतर खरेच काही संरक्षण देणारा आहे का, असा प्रश्न पडतो.

महाराष्ट्र शासन हे देशातील पुरोगामी राज्य असून या राज्यात लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारितेला संरक्षण देणारा कायदा केला आहे. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत हा कायदा केल्यानंतर राज्यपालांची सही झाल्यावर 'महाराष्ट्र प्रसार माध्यम व्यक्ती आणि प्रसार माध्यम संस्था हिंसा मालमत्तेचे नुकसान अधिनियम २०१७चे कलम २०१७ हा कायदा शासनाने लागू केला. या कायद्यान्वये पत्रकारांना संरक्षण देण्यात येईल असे शासनाने जाहीर केले, मात्र राज्यात वैद्यकीय आणि न्यायालयीन सेवेत काम करणारे यांच्यासाठी ज्या प्रकारे कायद्याचे संरक्षण आहे असे संरक्षण पत्रकारांवरील हल्ल्याच्या विरोधी तयार केले. या कायद्यात आहे काय? तर याचे उत्तर नाही असे द्यावे लागेल. पत्रकारांवर होणाऱ्या सततच्या हल्ल्यांमुळे शासनाने पत्रकार संघटनांच्या मागणीनंतर कायदा केला, पण हा कायदा खास व्यक्ती किंवा संस्था यांच्यासाठी असलेल्या कायद्यासाठी स्पेशल आहे काय? तर अजिबात नाही. त्यामुळे हा कायदा पत्रकारांना संरक्षण देणारा आहे की नावापुरता आहे याचा विचार राज्यातील पत्रकार संघटनांनी करायला हवे.

महाराष्ट्र राज्यातील पत्रकारांना संरक्षण देणारा कायदा हा वेगळ्या धर्तीवर बनविण्यात आलेला कायदा नसून हा कायदा पत्रकारांवरील हल्ल्यानंतर केवळ दखल घेणारा गुन्हा आहे, कारण पत्रकारांवर हल्ला झाल्यानंतर केवळ तत्काळ गुन्हा नोंद करण्याची तरतूद केली आहे. त्याचवेळी पत्रकारांवर हल्ला झाल्यानंतर त्या गुन्ह्याचा तपास पोलीस उपअधीक्षक दर्जाचा अधिकारी करणार असतो हे वगळता या कायद्याचे संरक्षण पत्रकारांना अन्य कोणत्याही प्रकारची खास कलमे बनवून देण्यात आले नाही. पत्रकारांना संरक्षण देणारा कायदा जरी असला तरी त्या गुन्ह्यातील कलमे ही भारतीय दंड संहिता यावर आधारित आहेत. त्यामुळे पत्रकारांवर गुन्हा दाखल झाल्यानंतर तत्काळ दखल घेऊन गुन्हा दाखल होतो, मात्र कारवाई होते ती भारतीय दंड संहितेच्या कलमांवर. त्यामुळे सामान्य व्यक्तींवरील गुन्ह्यात जी कलमे वापरली जातात तीच कलमे जर पत्रकारावर हल्ला झालेल्या गुन्ह्यात समाविष्ट असतील तर सामान्य व्यक्तीसारखे कायदे पत्रकारांनादेखील लागू आहेत. त्यामुळे असे वेगळे कायदे केल्याने पत्रकारांना खरेच संरक्षण मिळणार आहे काय याच गांभीर्याने विचार शासनकर्ते आणि पत्रकार संघटना यांनी करायला हवा, कारण एखाद्या पत्रकाराला एखाद्या बातमीवरून मारहाण झाली, हल्ला झाला तर तत्काळ गुन्हा दाखल करण्याचे निर्देश २०१७मध्ये मंजूर झालेल्या कायद्यात आहे, मात्र पत्रकार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यासाठी पोहचल्यावर अनेक पळवाटांचा वापर गुन्हा दाखल होऊ नये यासाठी केला जातो याचा प्रत्यय राज्यातील असंख्य पत्रकारांना वेळोवेळी येत असतो, शिवाय त्या वेळी पत्रकाराला तो ज्या कोणत्या दैनिकात, साप्ताहिकात किंवा कोणत्या वृत्तसंस्थेत काम करतो याबाबत पुरावे द्यावे लागतात. बातमी दिली म्हणून मारहाणीला सामोरे गेलेल्या पत्रकारांकडे ओळखपत्र नसेल, तर मग ते वृत्त संकलन करीत असलेल्या वृत्तसंस्थेने दिलेले नियुक्तीपत्र पोलिसांपुढे सादर करावे लागते. पोलीस प्रशासनाकडे फिर्याद मागायला आलेल्या त्या पत्रकारांकडे ते वृत्तसंकलन करीत असलेल्या वृत्तसंस्थेचे आरएनआय नोंदणी पत्र मागितले जाते. अशा प्रकारे विविध कागदपत्रांची मागणी करणारे पोलीस प्रशासन पत्रकारावर हल्ला झाल्यानंतर गुन्हा तर दाखल करतात, पण त्या गुन्ह्यातील आरोपीला शिक्षा होण्यासाठी आवश्यक असलेली कलमे लावतात काय?



याबाबत शासनाने वकिलांचे पॅनल मारहाण किंवा हल्ला झालेल्या पत्रकारांसाठी उभे करायला हवे. घटना घडल्यानंतर आधी गुन्हा दाखल होणे आवश्यक असते. त्या वेळी घाईघाईत गुन्हा दाखल केला जातो आणि आरोपीला अटक झाल्यानंतर तत्काळ जामीनदेखील मिळतो. त्यामुळे महाराष्ट्र प्रसार माध्यम व्यक्ती आणि प्रसार माध्यम संस्था हिंसा मालमत्तेचे नुकसान अधिनियम २०१७चे कलम ४ हा कायदा कशासाठी आहे याचा प्रश्न फिर्यादी पत्रकाराला पडतो. शासनाने अशा प्रकारच्या गुन्ह्यात फिर्यादी पत्रकाराला कायदेशीर सल्ला देणारी यंत्रणा तयार करायला हवी. त्याचवेळी त्याच्याकडून कायद्याची माहिती संबंधित पत्रकारांना तत्काळ देण्याची गरज महत्त्वाची ठरणारी असेल. त्यासाठी राज्य सरकारने कायद्यात नवीन शिफारशींना मान्यता देऊन कायद्यातून पत्रकारांना खऱ्या अर्थाने संरक्षण देण्याची गरज आहे.

**विशेष कलमे तयार केली जाणार काय?**

राज्यातील पत्रकार संघटनांच्या सततच्या मागणीनंतर राज्य सरकारने महाराष्ट्रातील नोंदणीकृत पत्रकारांना संरक्षण करणारा कायदा संमत केला. राज्यातील वेगवेगळ विचार असलेल्या विविध पत्रकार संघटनांनी यासाठी अनेक वर्षे विविध प्रकारची आंदोलने केली. त्यातून कायदा प्रत्यक्षात आला, पण त्या कायद्यात वेगळी कलमे नाहीत की त्यामुळे पत्रकारावर हल्ला करणाऱ्याला शिक्षा होईल. केवळ दखलपात्र गुन्हा वगळता कोणतेही संरक्षण पत्रकारांना महाराष्ट्र प्रसार माध्यम व्यक्ती आणि प्रसार माध्यम संस्था हिंसा मालमत्तेचे नुकसान अधिनियम २०१७चे कलम ४ या कायद्याने दिले नाही. त्यामुळे भारतीय दंड संहितासारखे एखादे नवीन कलम या पत्रकारांच्या हल्लाविरोधी कायद्यात समाविष्ट असायला हवे. त्यासाठी आता पत्रकार संघटनांनी राज्य सरकारकडे मागणी करण्याची गरज आहे. पत्रकारावर हल्ला झाल्यानंतर पत्रकारांना संरक्षण देणारे एखादे वेगळे कलम, वैद्यकीय सेवा आणि वकील सेवा देणारे यांच्यासाठी दिलेले अधिकार पत्रकारांवरील हल्ल्याच्या कायद्यात अजिबात नाहीत. शासनाच्या कायदेतज्ज्ञांनी पत्रकारांवरील हल्ला झाल्यानंतर खरेखुरे संरक्षण देणारा कायदा तयार करायला हवा.

**आरोपी रक्षणकर्ता असेल तर?**

पत्रकारावर हल्ला करणारा कायद्याचे रक्षण करणारा असेल तर त्या कायद्याचे संरक्षण करणाऱ्याला पत्रकारांच्या हल्ल्यातील कायद्यातून कसे बाहेर काढता येईल याचाच प्रयत्न पोलीस यंत्रणा करताना दिसते. याचा प्रत्यय रायगड जिल्ह्यातील नेरळ पोलीस ठाण्यात आला. तेथे पत्रकारावर हल्ला झाला आणि त्यानंतर गुन्हा दाखल करायला गेलेल्या पत्रकारांची अडवणूक करणारी कारणे प्रशासनाकडून देण्यात आली. पत्रकारावर हल्ला झाल्यानंतर त्या माध्यम प्रतिनिधीची तक्रार दाखल करून घ्यायची असते.त्यानंतर तो खराखुरा पत्रकार आहे की नाही ते टॅप्सचा भाग असतो, मात्र त्या ठिकाणी गुन्हा दाखल करताना करताना पोलीस अधिकाऱ्यांनी ओळखपत्र मागणे, वृत्तसंस्थेचे नियुक्तीपत्र मागणे, त्या वृत्तसंस्थेचे आरएनआय नोंदणी प्रमाणपत्र मागणे हा सर्व अडवणुकीचा प्रकार सुरू होता. त्यात यापूर्वी दाखल झालेल्या गुन्ह्याचे एफआयआर पोलीस प्रशासनाला देऊनदेखील त्रुटी ठेवण्यात आल्या. संबंधित गुन्ह्यात आरोपी असलेला तरुण हा पोलीस कर्मचारी असल्याने त्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी स्थानिक पोलिसांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांची परवानगी घेण्याची आश्यकता असताना असे काही झाले नाही. त्याचवेळी संबंधित गुन्ह्यातील आरोपी असलेला तरुण कायद्याचा रक्षक असल्याने त्याने पत्रकाराला घरापर्यंत जाऊन हल्ला करण्यासाठी दबा धरून राहण्याचा प्रयत्न यावर वेगळे कलम लागणे आवश्यक होते, मात्र तसे झाले नाही. त्यामुळे तो गुन्हा टिकणारा ठरत नाही आणि आरोपीची तत्काळ सुटका होते.

**चार्जशीटसह आरोपी हजर करणे गरजेचे आहे काय?**

राज्यातील असंख्य गुन्हे असे आहेत की त्या गुन्ह्यात आरोपी मोकाट आहेत. असंख्य गुन्ह्याचे चार्जशीट न्यायालयात ठराविक अवधीत पोहचत नाहीत, मात्र नेरळ येथील पत्रकारावर गुन्हा दाखल झाला आणि त्यात आरोपीला न्यायालयात हजर करताना थेट चार्जशीटसह हजर केले. आरोपी केवळ अटक दाखविण्यापुरता पोलीस ठाण्यात होता आणि काही वेळाने न्यायालयात पोहचल्यावर लगेच बाहेर आला. गुन्हा दाखल झाल्यानंतर तब्बल सात दिवसांनी या आरोपीला अटक दाखविण्यात आली. गुन्हा नेरळ पोलीस ठाणे हद्दीत झाला असताना आरोपी तरुण थेट कर्जत येथील पोलीस उपाधीक्षक कार्यालयात स्वतःला अटक करून घेण्यासाठी पोहचला. तेथून नेरळ पोलीस ठाण्यात आरोपीला अटक झाल्याची खबर पोहचविली गेली. या संपूर्ण प्रक्रियेत बदल करण्याची गरज आहे.

# शिक्षक परिषदेच्या शिष्टमंडळाने घेतली राज्यपालांची भेट

## प्रलंबित प्रमुख मागण्यांवर चर्चा



**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाच्या शिष्टमंडळाने नुकतीच राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची राजभवनात भेट घेतली. राज्यातील शिक्षकांच्या प्रलंबित मागण्या आणि भेडसावणारया समस्यांबाबत राज्यपालांना माहिती देऊन त्यावर चर्चा करण्यात आली.

या शिष्टमंडळाचे नेतृत्व शिक्षक परिषदेचे संस्थापक अध्यक्ष आमदार संजय केळकर यांनी केले. १ नोव्हेंबर २००५नंतर सेवेत लागलेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करून ज्या डीसीपीएसधारक शिक्षक बांधवांचा मृत्यू झालेला आहे त्यांच्या कायदेशीर वारसास अनुकंपा तत्त्वाचा लाभ मिळावा, ज्या डीसीपीएसधारक शिक्षकांचा मृत्यू झाला आहे अशांना सेवेची कोणतीही अट न ठेवता सरसकट १० लाख रुपये अनुदान प्राप्त झाले पाहिजे. एमएससीआयटीला २०२२पर्यंत मुदतवाढ द्यावी व ज्यांची वसुली करण्यात आलेली आहे त्यांची रक्कम त्यांना अदा करावी, अशी मागणी या वेळी निवेदनातून करण्यात आली.

शिक्षक मतदारसंघात जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांना मतदानाचा अधिकार मिळावा यासाठी महाराष्ट्र लोकप्रतिधित्व कायद्यात दुरुस्ती करण्याबाबत चर्चा करण्यात आली. प्राथमिक शिक्षकांना आश्वासित प्रगती योजना लागू करणे, शाळांना विद्युत देयके अनुदान प्राप्त होणे, शिक्षकांना कॅशलेस वैद्यकीय प्रतिपूर्ती सुविधा प्राप्त होणे, आंतरजिल्हा बदलीसाठी पती-पत्नी विनाअट एकत्रिकरण करणे या परिषदेच्या प्रमुख मागण्या आहेत.

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद संचलित त्रैमासिक शिक्षकमित्रच्या अंकाचे प्रकाशन या वेळी राज्यपालांच्या हस्ते झाले. शिक्षक परिषदेने कोविड काळात केलेल्या कामाची माहितीही राज्यपालांना देण्यात आली.

जिल्हा परिषद शाळेचा शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी शिक्षकांनी विशेष प्रयत्न करून आपल्या पाल्यांना मातृभाषेतून शिक्षण देण्यासाठी पालकांना प्रोत्साहित करावे, यासाठी शिक्षकांनी प्राधान्य द्यावे. शिक्षक हा राष्ट्राचा निर्माता असून समाजाचा मित्र आहे, असे राज्यपाल कोश्यारी यांनी या वेळी नमूद केले.

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाच्या शिष्टमंडळात राज्याध्यक्ष राजेश सुर्वे, त्रैमासिकाचे संपादक डॉ. सतपाल सोवळे, शिक्षक नेते रावसाहेब रोहकले, राज्य कोषाध्यक्ष पुरुषोत्तम काळे, कार्यकारी अध्यक्ष मधुकर उन्हाळे, प्रकाश चतरकर, कार्याध्यक्ष बाबुराव गाडेकर, भरत मडके, संपर्कप्रमुख राजेंद्र नांद्रे, बालाजी गुबनारे, नितीन चव्हाण यांचा समावेश होता.

## आरोग्य प्रहर

# उन्हाळ्यात 'या' पदार्थांचा आहारात करा समावेश

बदलत्या ऋतूनुसार अनेक शारीरिक बदलदेखील होत असतात. त्यानुसार आपण आपला आहार तसेच एकंदर जीवनपद्धती न ठेवल्यास याचे शरीरावर अनेकदा दुष्परिणामदेखील बघायला मिळत असतात. आयुर्वेदात अर्ध्या रोगांचे मूळ पोटाला सांगितले आहे. जर तुम्हाला आजारांपासून दूर ठेवायचे असेल, तर पोटाची विशेष काळजी घेण्याचा सल्ला दिला जात असतो. पोटाच्या समस्या वारंवार डोके वर काढत असल्यास आहारात काही बदल करणे गरजेचे असते.



**आवळ्याचा मुरब्बा**–आवळा पोटासाठी खूप चांगला असतो. आवळ्याच्या सेवनामुळे गॅस, ॲसिडीटी आणि बद्धकोष्ठता आदी समस्या असतील त्यांनी उन्हाळ्यात रोज आवळ्याच्या मुरब्ब्याचे सेवन करावे. आवळ्याचा मुरब्बा फायबरने समृद्ध आणि थंड आहे. हे खाल्ल्याने आतडे निरोगी राहतात. आवळ्याचा मुरब्बा सकाळी रिकाम्या पोटी खावा. तो खाल्ल्यानंतर अर्धा तास काहीही खाऊ नये. यातून पोटाचे आरोग्य निरोगी राहते.

**सर्वांना आवडणारी खिचडी**–खिचडी अतिशय फायदेशीर, हलकी आणि पचायला सोपी आहे. ती पोटाच्या आरोग्यासाठी खूप चांगली मानली जाते. याशिवाय खिचडीमुळे पोटाच्या इतर समस्याही दूर होतात. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही खिचडीमध्ये काही भाज्याही वापरू शकता.

**दही**–दह्यात प्रथिने, कॅल्शियम, रिबोफ्लेविन, व्हिटॅमिन बी ६ आणि व्हिटॅमिन बी १२सारख्या पोषक तत्त्वांचा समावेश असतो. दह्यामध्ये चांगले बॅक्टेरिया असतात, जे पोटाच्या समस्या दूर करण्यासाठी आणि पचन सुधारण्यासाठी उपयुक्त असतात. ते खाल्ल्याने गॅस, ॲसिडीटी आदी समस्या होत नाहीत.

**इडली**–इडली ही पचायला अतिशय हलकी असते. इडलीत मोठ्या प्रमाणात पौष्टिक घटक असतात. शिवाय लवकर पचत असल्याने पोटाच्या सर्व समस्यांपासून आराम मिळतो. बहुतांश ठिकाणी रव्यापासून इडली बनवली जाते. त्यामुळे ती खायला खूप चविष्ट लागते.

**मुगाची डाळ**–उन्हाळ्यात मूगाच्या डाळीचा आहारात समावेश करणे आवश्यक आहे. प्रथिने, लोह, कॅल्शियम, जीवनसत्त्वे, अँटी-ऑक्सिडंट्स, अँटी-बॅक्टेरियल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्मांनी समृद्ध असलेली मूगाची डाळ पचायला हलकी असते. अनेकदा आजारपणात मुगाच्या डाळीचे सेवन केले जात असते तसेच मोड आलेले हिरवे मूगदेखील अतिशय उत्तम नाश्ता मानला जातो.





# धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे स्वच्छता अभियान

**अलिबाग : प्रतिनिधी**

ज्येष्ठ निरूपणकार महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त स्वच्छतादूत पद्मश्री डॉ. श्री. आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

आरोग्य, व्यसनमुक्ती आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी स्वच्छतेचा संदेश देत समाजाला निरुपणाच्या माध्यमातून चांगले विचार देणारे ज्येष्ठ निरूपणकार डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून प्रतिष्ठानतर्फे अलिबाग तालुक्यात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सकाळपासूनच श्रीसदस्य हातामध्ये झाडू, पंजे, फावडे, कोयते घेऊन टेम्पो, टॅक्टरसह अभियानात सहभागी झाले होते. या वेळी अलिबाग-नागाव-रेवदंडा व अलिबाग-बेलकडे-सहाण-नागाव या रस्त्यांच्या दुतर्फा वाढलेले गवत, झुडूपे, कचरा, काचेच्या व प्लॅस्टिकच्या बाटल्या उचलून रस्ता दुतर्फा स्वच्छ करण्यात आला.



या स्वच्छता अभियानामध्ये एकूण २०३५ श्रीसदस्यांनी ६६ किमी रस्ता दुतर्फा स्वच्छ केला असून त्यातून ७२ टन कचरा गोळा करण्यात आला. या कचऱ्याची कुरूळ व सहाण येथील डम्पिग ग्राऊंड जागेत योग्य विल्हेवाट लावण्यात आली. या वेळी टेम्पो, ट्रॅक्टर, डम्पर व जेसीबी अशा एकूण ६५ वाहनांचा वापर करण्यात आला.

# कोलाड येथे करिअर कट्टाचे उद्घाटन

**रोहे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने कोलाड येथील डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात नुकतेच प्रा. डॉ. बी. के. सिनगारे यांच्या हस्ते विद्यार्थी हा केंद्र बिंदू मानून करिअर कट्टाचे उद्घाटन करण्यात आले.

संस्थेचे ट्रस्टी संदीप तटकरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर मुंडे, अजित तेलंगे, प्राचार्य विपूल मसाळ, प्रा. दिपाली भालेकर, करिअर कट्टाचे संयोजक प्रा. सूर्यकांत आमलपुरे यांच्यासह विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.

प्रा. डॉ. बी. के. सिनगारे यांनी या वेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.



# युक्रेनमध्ये अडकलेल्या विद्यार्थ्यांबाबत पालकांना चिंता

## ▪ सर्व भारतीयांना मायदेशी आणण्यासाठी केंद्र सरकारचे युद्धपातळीवर प्रयत्न

**पनवेल : वार्ताहर**

रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाले असून अनेक भारतीय नागरिक आणि विद्यार्थी युक्रेनमध्ये असल्याने भारतात चिंता व्यक्त होत आहे. हे लक्षात घेत तेथील भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी भारत सरकारने पावले उचलली आहेत.

युद्धाच्या पार्श्वभूमीवर याआधी रायगड जिल्हा प्रशासनाने हेल्पलाईन जारी केली होती. या वेळी पनवेल तालुक्यातील समीक्षा सिरसाट, अद्वैत गाडे, रुशक्ती भोगले, कुणाल कुवेसकर, शिल्पीता बोरे, प्रचिती पवार हे विद्यार्थी शिक्षणासाठी युक्रेनमध्ये असल्याची माहिती प्रशासनाला प्राप्त झाली आहे. हे सगळे विद्यार्थी सुखरूप असून पालकही त्यांच्या व्हिडीओ कॉलद्वारे संपर्कात आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली.

पनवेल तालुक्यातील शिक्षणासाठी गेलेले विद्यार्थी युक्रेनमध्ये अडकल्याची माहिती पालकांनी जिल्हा प्रशासनाला कळवली. एका विद्यार्थ्याच्या म्हणण्यानुसार, पाण्याचे सर्व सोर्स बंद झालेत. पिण्याच्या पाण्यासाठी आतापासूनच मोठी रांग लागली. सर्व लोक आपापल्या घरात आवश्यक ती साधन सामग्री गोळा करण्याच्या प्रयत्नात आहे.



(प्रातिनिधीक छायाचित्र)



**पनवेल तालुक्यातील युक्रेन येथे शिक्षणासाठी गेलेले विद्यार्थी अडकून पडल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाला प्राप्त झाली आहे. आम्ही या विद्यार्थ्यांच्या पालकांच्या सतत संपर्कात असून जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत त्यांना सर्वतोपरी मदत करू.**
**-विजय तळेकर, तहसीलदार, पनवेल**

केंद्र सरकारकडून युक्रेनमध्ये अडकलेल्या विद्यार्थ्यांना मायदेशी सुखरूप परत आण्याचे प्रयत्न सुरू झाले असून २१९ भारतीयांना घेऊन रवाना झालेले एअर इंडियाचे पहिले विमान शनिवारी (दि. २६) रात्री मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर दाखल झाले. या विमानाने दुपारी रोमानियाची राजधानी बुचारेस्ट येथून भारतासाठी उड्डाण केले होते. रशियन हल्ल्यानंतर युक्रेनमध्ये मोठ्या प्रमाणात भारतीय नागरिक अडकले आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांची संख्या सर्वाधिक आहे. भारतीय नागरिकांची सुखरूप सुटका व्हावी यासाठी मोदी सरकार प्रयत्नशील असून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

युक्रेनमध्ये अडकलेल्या भारतीयांना रस्तेमार्गाने रोमानिया आणि हंगेरीत आणण्यात आले असून तेथून विमानाने मायदेशी परत आणण्याची प्रक्रिया सुरू आहे.

दरम्यान, उर्वरित विद्यार्थी सुखरूप परत यावे याकरिता पालक आणि त्यांच्या नातेवाइक देवाची प्रार्थना करीत आहेत.

# बेलापूर स्मार्ट व्हिलेजसाठी आमदार मंदा म्हात्रे यांची ग्रामस्थांसोबत बैठक


**नवी मुंबई : प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून तसेच राज्याचे विरोधी पक्षनेते व माजी मुख्यमंत्री यांच्या गाव दत्तक योजनेच्या माध्यमातून नवी मुंबईतील सर्वच गावे स्मार्ट व्हिलेजच्या दिशेने वाटचाल करीत आहेत. दिवाळे गावासोबतच आता बेलापूर गावही स्मार्ट होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर आमदार मंदा म्हात्रे यांची बेलापूर गावातील राम मंदिर येथे ग्रामस्थांसह सर्व पक्षीय बैठक झाली.

या वेळी माजी नगरसेवक दि. ना. पाटील, अमित पाटील, ज्येष्ठ समाजसेवक महादेव पाटील, बाळकृष्ण बंदरे, रविंद्र म्हात्रे, राम मंदिर संस्थेचे अध्यक्ष दिलीप घोसाळकर, संदीप पाटील, सीमा मुकादम, शैला म्हात्रे, ज्योती पाटील, तुकाराम म्हात्रे, प्रकाश पाटील, संदेश पाटील तसेच असंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

या वेळी ग्रामस्थांनी राम मंदिराच्या बाजूचा भूखंड उत्सवाकरिता सिडकोकडून मागणी करणे, गावामध्ये मार्केट, उद्यान, खेळाचे मैदान उपलब्ध करून देणे, समाजमंदिर उभारणे, गावाचा विकास करण्यासाठी अशी विविध विकास कामे करण्याबाबत मागणी ग्रामस्थांना कडून करण्यात आली.





बेलापूर गाव हे शिक्षणाचे माहेर घर म्हणून नवी मुंबईत नावाजलेले असून एक स्मार्ट व्हिलेज म्हणूनही ओळख निर्माण व्हावी याकरिता सिडकोने राखीव ठेवलेले भूखंड महापालिकेला हस्तांतरित केल्यास गावाचा विकास जलद गतीने करता येणार आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील ग्रामीण भागाचा विकास व्हावा, ग्रामीण भागातील नागरिकांना सोई-सुविधा उपलब्ध व्हाव्यात याकरिता प्रत्येक गाव हे स्मार्ट व्हिलेज व्हावे हे स्वप्न पाहिले असून ते आपण साकार करण्यासाठी कटिबद्ध आहोत. बेलापूर गाव ही स्मार्ट व्हावे याकरिता ग्रामस्थांनी पुढाकार घेतला त्याबद्दल सर्वपक्षीय नेते व ग्रामस्थ यांचे आभार मानते, असे आमदार मंदा म्हात्रे यांनी या वेळी म्हटले.

**स्मार्ट व्हिलेजमुळे स्थानिकांना रोजगार, चांगले शिक्षण, आरोग्य सुविधा, व्यायामशाळा, स्वच्छतागृहे, पार्किंग व्यवस्था अशा सुविधाही मिळणार आहेत. त्यामुळे गावाच्या विकासाकरिता एक सर्व पक्षीय समिती स्थापन करून त्यासाठी युवकांनी व महिलांनी पुढाकार घ्यावा.**
**-मंदा म्हात्रे, आमदार, बेलापूर**



# पनवेलमध्ये पल्स पोलिओ मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका व आरोग्य केंद्राच्या मार्फत प्रभाग क्रमांक १९ मध्ये पल्स पोलिओ मोहीम राबविण्यात आली.

यामध्ये कोळीवाडा, विसावा हॉटेल, आरोग्य केंद्र गावदेवी पाडा, रेल्वे स्टेशन, बस डेपो व झोपडपट्टी परिसर ठिकाणी ही पल्स पोलिओ मोहीम राबविली गेली. या वेळी नगरसेविका दर्शना भोईर, भाजप शहर सरचिटणीस सपना पाटील, झोपडपट्टी सेलचे अध्यक्ष चंद्रकांत मंजुळे, प्रज्ञा ठाकूर, प्रियंका पाटील, कांचन पाटील यांच्यासह आरोग्य विभागाचा स्टाफ उपस्थित होता.

# पनवेल एसटी आगारात मराठी भाषा दिन साजरा

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल आगारात कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त रविवारी (दि. २७) सकाळी मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. या वेळी आगार व्यवस्थापक विलास गावडे यांनी आपल्या राज्यात संपूर्ण मराठीत कारभार असणारे महामंडळ म्हणजे एसटी महामंडळ असल्याचे प्रतिपादन केले.

पनवेल आगारात दरवर्षी कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या जयंती निमित्त मराठी भाषा दिन साजरा करण्यात येत असतो. यावर्षी एसटी कर्मचार्यांचा राज्य शासनात विलीनीकरणासाठी संप सुरू आहे. त्यामुळे अनेक कर्मचारी संपात सहभागी आहेत. ५० पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांना काढून टाकण्यात आले आहेत तरीही कामावर असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला.

स्थानकातील वाहतूक नियंत्रक कार्यालयाजवळ रांगोळी काढण्यात आली होती. कर्मचारी आणि प्रवाशी यांचे उपस्थितीत आगार व्यवस्थापक विलास गावडे यांनी कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहिली. त्यानंतर आजच्या दिवसाचे महत्व सांगून राज्य शासनाच्या एसटी महामंडळाचा कारभार संपूर्ण मराठीत चालत असल्याची माहिती दिली. या वेळी सहा. वाहतूक निरीक्षक जे. जे. ओव्हाळ, वाहतूक नियंत्रक एन. व्ही. भोसले, ई. ए. पाटील, ए. व्ही. जाधव, कारागीर प्रमुख बुटेपवाड व कारागीर एम. एस. शिंदे आदी उपस्थित होते.



**पनवेल : महिन्याच्या शेवटच्या रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मन की बात हा कार्यक्रम होत असतो. त्यानुसार भाजप शहर सरचिटणीस सपना पाटील यांच्या घरी भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मन की बात कार्यक्रमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मार्गदर्शन अनुभवले.**

# एसआरएल डायनॉस्टीक सेंटरतर्फे रक्त आणि नेत्र तपासणी शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

अत्याधुनिक सोईयुक्त असे एसआरएल डायनॉस्टीक सेंटर हे पनवेलकरांच्या सेवेसाठी सुरू झाले असून, या उदघाटना निमित्त आज सर्वांसाठी मोफत, रक्ततपासणी व मोफत नेत्र तपासणी हा उपक्रम राबवला होता. त्याला पनवेलकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या शिबिरास अनेक गरजू नागरिकांनी सहभाग घेतला. या वेळी अनेक नामांकित डॉक्टरांनीसुद्धा उपस्थिती लावली होती. आगामी काळातही दर महिन्याला दोनदा अशाप्रकारे मोफत शिबिर राबविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे





ज्या संस्था, संघटना यांना अशा प्रकारे उपक्रम राबवायचे असतील त्यांनी पनवेलमधील मिडलक्लास हौसिंग सोसायटी (पत्ता : शॉप नं.८, प्लॉट नं.१२३, गुरुकृपा अपार्टमेंट, एमटीएनएलसमोर) येथे संपर्क साधावा असे आवाहन लॅब डायरेक्टर जसोल सुभाषचंद्र बांठिया (८८२८८८२६२६) यांनी केले आहे.

# पनवेलमध्ये जागतिक पाणथळ दिन साजरा

**पनवेल : प्रतिनिधी**

जैवविविधतेचे जतन करायचे असेल आणि त्यामध्ये वाढ करायची असेल तर पाणथळांचे संरक्षण होणे अत्यंत आवश्यक आहे. या उद्देशाने माझी वसुंधरा अभियानंतर्गत पनवेल महानगरपालिका आणि पिल्लई महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पाणथळ दिन शुक्रवारी (दि. २५) साजरा करण्यात आला.

या निमित्ताने पिल्लई आर्कीटेक्चर महाविद्यालयांमध्ये 'पाणथळांचे संरक्षण' या विषयांवर प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन महापालिका अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या हस्ते करण्यात आले तसेच या प्रदर्शनास महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल, सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे यांनी भेट देऊन सर्व सहभागी स्पर्धकांचे कौतुक केले.

माझी वसुंधरा अंतर्गत 'पाणी'या विषयास महत्त्व देऊन पिल्लई महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पाणी वाचविण्यासाठीच्या उपाययोजना, तलावांचे तसेच पाणथळ जागांचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठीच्या विविध संकल्पना, त्यांचे सौंदर्यीकरण या विषयांवर विविध पोस्टर्स, मॉडेल्स तयार केले होते.

या कार्यक्रमासाठी पिल्लई आर्कीटेक्चर महाविद्यालयाच्या प्राचार्या संध्या महिमकर व पिल्लई आर्कीटेक्चर महाविद्यालयाचे प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

# खांदा कॉलनीमधील सोसायटीत फायर सेफ्टी अवरनेस प्रोग्राम

**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन पनवेल खांदा कॉलनीमध्ये सोसायटीतील रहिवाश्यांसाठी फायर सेफ्टी अवरनेस प्रोग्राम रविवारी (दि. २७) सिडकोच्या अग्निशमक विभागातर्फे आयोजित करण्यात आला होता. या मध्ये अनेक रहिवाश्यांनी सहभाग घेतला.



पनवेल महापालिका हद्दीत सध्या मोठ्या प्रमाणात आग लागण्याचा घटना घडत आहेत. त्यामुळे वित्तहानीही होत आहे. सामान्य नागरिक आग लागल्यावर घाबरून जातो. त्यामुळे दुर्घटनेची व्याप्ती वाढते म्हणून सिडकोच्या अग्निशमक विभागातर्फे फायर सेफ्टी अवरनेस प्रोग्राम खांदा कॉलनीतील सेक्टर १ मधील जी+१४ या ४ टावर असलेल्या तुलसी प्रेरणा सोसायटीमध्ये आयोजित करण्यात आला होता.

या वेळी स्टेशन ऑफिसर प्रतिक शिंदे व त्यांच्या टिमने सोसायटीतील नागरिकांना आग लागल्यावर कशी काळजी घ्यावी याची प्रात्यक्षिकसह माहिती दिली. सोसायटीचे अध्यक्ष लक्ष्मण साळुंके व सचिव संजीव श्रीवास्तव यांनी प्रतीक शिंदे व त्यांच्या टिमचे आभार मानले.

# पनवेल मनपाच्या काव्यसंमेलनाला प्रतिसाद

## ▪ मराठी भाषा गौरव दिनानिमित्त उपक्रम

**पनवेल : प्रतिनिधी**

मराठी भाषा गौरव दिनाच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी (दि. २५) प्रेमकवितेतून व्यक्त झालेला प्रियकर, भावकवितेतून व्यक्त होणारी तरुणी, शेतकऱ्यांची वेदना, स्त्रीची आई, मुलगी अशी विविध रूपे कवितेच्या माध्यमातून अनुभवण्याची संधी पनवेल महापालिकेच्या वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी व नागरिकांना मिळाली.

मराठी भाषा गौरव दिनाच्या पार्श्वभूमीवर आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात शुक्रवारी काव्य संम्मेलन आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रशांत मोरे, भरत दौंडकर, आबेद शेख, अनंत राऊत, राजेंद्र राठोड या कवींनी एकापेक्षा एक दर्जेदार कविता सादर करत रसिकांची भरभरून दाद मिळवली. शब्दालंकारांनी भरलेली ही मैफल कवितेच्या सर्वच प्रकारांना स्पर्श करत उत्तरोत्तर रंगत गेली.

कवी प्रशांत मोरे यांच्या प्रसिद्ध'मैना'कवितेने काव्य संमेलनाचा शेवट झाला.



महापालिकेच्या माध्यमातून १४ ते २८ जानेवारी २०२२ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला होता. त्यातील स्पर्धांचे बक्षीस वितरण या वेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कम व मानचिन्ह या वेळी देण्यात आले.

या वेळी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त गणेश शेटे, उपायुक्त कैलास गावडे, शहर अभियंता संजय जगताप, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, लेखाधिकारी डॉ. संग्राम व्होरकाटे, लेखाधिकारी विनयकुमार पाटील, तसेच पालिका अधिकारी व कर्मचारी, नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षण विभागाच्या शुभांगी चव्हाण यांनी केले, तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त विठ्ठल डाके यांनी केले. शिक्षणाधिकारी बाबासाहेब चिमणे यांनी मान्यवर कवींची ओळख करून दिली. कार्यक्रमाचे आभार सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे यांनी मानले.

# सिडको हद्दीतील पहिलीच बी १० सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन

**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन पनवेल सिडको वसाहतीतील ओनर्स असोशीएशनचे गृह निर्माण संस्थेत रूपांतरण होण्याचा मान बी-१० ओनर्स असोसिएशनला मिळाला असून त्याचे नामकरण रविवारी (दि. २७) भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील घरत यांच्या हस्ते करण्यात आले. पनवेल महानगरपालिकेमधील सिडको हद्दीतील पहिलीच अशी गृहनिर्माण संस्था आहे यानंतर लवकरात लवकर पुनर्विकास करण्यात येणार आहे.

नवीन पनवेल (पूर्व) मध्ये सिडको वसाहत आहे. या ठिकाणी असलेल्या वसाहतीत सिडकोने सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्यादित) स्थापन न करता अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन स्थापन केल्या आहेत. त्यामुळे त्यांना सहकारी गृहनिर्माण संस्थेचे अधिकार मिळत नाहीत. सिडकोने बी-१० अपार्टमेंटचे १९८० साली बांधकाम करून १९८३ साली लोकांना हस्तांतरण करून रजिस्ट्रेशन केले. सध्या सिडकोने बांधलेल्या सर्व इमारती जीर्ण झालेल्या आहेत. इमारतींचे स्लॅप पडणे, कॉलमला तडे जाणे. अशा तक्रारी येत होत्या म्हणून सर्व रहिवाशांनी एकत्र येऊन या गृहनिर्माण संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला असोशिएशनचे अध्यक्ष अनिल घरत व सर्व कमिटी सदस्यांनी पूर्ण वेळ देऊन कामकाज पूर्ण केले.

या संस्थेचे नवीन नामकरण बी १० सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्यादित) असे होऊन २५ फेब्रुवारीपासून कार्यरत झाली आहे. नामकरण कार्यक्रमाचे उद्घाटन सुनील घरत, माजी नगराध्यक्ष व अनिल घरत अध्यक्ष, सचिव अजित म्हात्रे बी-१० अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन यांनी केले. या कार्यक्रमास सर्व पदाधिकारी इमारत प्रतिनिधी पुनर्विकास कमिटी व सर्व घरमालक उपस्थित होते.




**FLAT FOR RENT**

Phase 2, Block 2, A 305, Jewel Residency, Near Sarvodaya Nagar, Near Mahalakshmi Temple, Nere, Old Panvel, Raigad. One Bedroom, Hall and Kitchen, 431 sq.ft. (carpet) With balcony and a loft.

▪ Contact No. : **9833232251, 9321825431**



**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**
**विभाग, माणगांव**
**ई-निविदा सूचना क्र. ०६ सन २०२१-२०२२**

जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत खालील पाणीपुरवठा योजनेच्या कामाची निविदा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण विभाग माणगांव यांचेकडून मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | योजनेचे नांव | अंदाजित किंमत (रु.लक्ष) |
|---|---|---|
| १ | चाणजे पाणीपुरवठा योजना ता. उरण जि. रायगड | ८९४.७१ |

योजनेचा सविस्तर तपशील दि. २८/०२/२०२२ पासून www.mahatender.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

दिनांक :- २१/०२/२०२२

सही/-
(व्ही. के. सुर्यवंशी)
कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
विभाग माणगांव

# आजपासून भिवंडीत घुमणार कबड्डीचा दम

## ६९व्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचा थरार

**भिवंडी : प्रतिनिधी**

ठाणे विरुद्ध परभणी, रत्नागिरी विरुद्ध पालघर या पुरुष, तर ठाणे विरुद्ध सिंधुदुर्ग, पुणे विरुद्ध सांगली या महिला गटातील लढतींनी ६९व्या वरिष्ठ गट पुरुष आणि महिला राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेचे बिगूल वाजणार आहे. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या वतीने ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या यजमानपदाखाली हिंदवी युवा प्रतिष्ठान व वेताळ क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त सहकार्याने सोमवार (दि. २८)पासून भिवंडीच्या बंदऱ्या मारुती क्रीडानगरीत चार दिवस ही स्पर्धा रंगणार आहे.

या स्पर्धेतूनच महाराष्ट्राचा पुरुष व महिला गटाचा संघ निवडण्यात येणार असून तो ६९व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करेल. नुकतीच प्रो-कबड्डी स्पर्धा आटोपल्याने त्या स्पर्धेत खेळलेले खेळाडू या स्पर्धेत खेळण्याची शक्यता आहे. या स्पर्धेकरिता मातीची सहा उत्तम अशी क्रीडांगणे तयार करण्यात आली असून कबड्डी दर्शकांना सामन्याचा आनंद लुटता यावा म्हणून पाच हजार क्षमतेची प्रेक्षक गॅलरी उभारण्यात आली आहे. सामने सकाळ आणि सायंकाळच्या सत्रात प्रखर विद्युत झोतात खेळविण्यात येतील. या स्पर्धेचे उद्घाटन सोमवारी सायंकाळी ५.३० वा. केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील, राज्य कबड्डी असोसिएशनचे कार्याध्यक्ष खासदार गजानन कीर्तिकर आणि आयोजक श्रीधर पाटील यांच्या उपस्थितीत होणार आहे.



प्रो लीग हॉकी (महिला)

# भारताची विजयी हॅट्ट्रिक

**भुवनेश्वर : वृत्तसंस्था**

भारतीय महिला संघाने ‘एफआयएच’ प्रो लीग हॉकीमधील दमदार कामगिरीत सातत्य राखताना शनिवारी सलग तिसऱ्या विजयाची नोंद केली. त्यांनी स्पेनवर २-१ अशी सरशी साधली.

भुवनेश्वर येथील किलगा स्टेडियमवर झालेल्या या सामन्याच्या पहिल्या सत्रात भारताला जागतिक क्रमवारीत सहाव्या स्थानी असलेल्या स्पेनचा बचाव भेदण्यात यश आले, मात्र त्यांना याचे गोलमध्ये रूपांतर करता आले नाही. दुसऱ्या सत्रात स्पेनने जोरदार प्रतिहल्ला करताना १८व्या मिनिटाला आघाडी मिळवली. त्यांचा हा गोल मार्ता सेगूने केला, पण त्यांची आघाडी केवळ दोन मिनिटेच टिकू शकली. २०व्या मिनिटाला ज्योतीने गोल झळकावत भारताला १-१ अशी बरोबरी साधून दिली.



तिसऱ्या सत्रात यजमान भारताला गोलच्या फारशा संधी निर्माण करता आल्या नाहीत. चौथ्या सत्रात स्पेनच्या आक्रमणापुढे भारताच्या बचाव फळीला तग धरण्यात यश आले. बचाव फळीकडून प्रेरणा घेत भारताच्या मध्यरक्षक आणि आघाडीपटूंनी आपला खेळ उंचावला. ५२व्या मिनिटाला वंदना कटारियाने मारलेला फटका स्पेनची गोलरक्षक अ‍ॅना कॅल्व्होने अडवला, पण चेंडू थेट नेहाकडे गेला आणि तिने गोल करत भारताला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. अखेर नेहाचा हाच गोल निर्णायक ठरला.

भारताने पहिल्या दोन सामन्यांत चीनला पराभूत केले होते. त्यामुळे भारताचा हा सलग तिसरा विजय ठरला.

# सर्वाधिक टी-२० सामने खेळण्याचा रोहित शर्माचा विक्रम

**धर्मशाला : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा नवा कर्णधार रोहित शर्माने रविवारी (दि. २७) श्रीलंकेविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात इतिहास रचला. धर्मशाला येथील रोहितचा हा १२५वा आंतरराष्ट्रीय टी-२० सामना होता. यासोबतच तो जगातील सर्वाधिक आंतरराष्ट्रीय टी-२० सामने खेळणारा खेळाडू ठरला आहे. त्याने या बाबतीत पाकिस्तानचा दिग्गज खेळाडू शोएब मलिकचा विक्रम मोडला. मलिकच्या नावावर १२४ टी-२० सामन्यांची नोंद आहे.

सर्वाधिक टी-२० सामने खेळणाऱ्या खेळाडूंच्या यादीत पहिल्या तीनमध्ये पाकिस्तानचे दोन खेळाडू आहेत. मलिकनंतर त्याचा सहकारी मोहम्मद हाफिज तिसऱ्या क्रमांकावर आहे. हाफिजने ११९ सामन्यांमध्ये



पाकिस्तानचे प्रतिनिधित्व केले आहे. त्याच्यापाठोपाठ इंग्लंडचा इऑन मॉर्गन आणि बांगलादेशचा महमुदुल्ला यांचा क्रमांक लागतो. मॉर्गनने ११५, तर महमुदुल्लाहने ११३ सामने खेळले आहेत. रोहितनंतर माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीचा क्रमांक लागतो. धोनीने ९८ सामने खेळले आहेत.

तिसऱ्या टी-२० सामन्यात रोहित शर्माने नाणेफेक गमावली. श्रीलंकेने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या सामन्यात इशान किशन, जसप्रीत बुमराह, भुवनेश्वर कुमार, आणि यजुर्वेंद्र चहल यांना विश्रांती देण्यात आली होते. १२५व्यांदा देशाचे प्रतिनिधित्व करताना चांगले वाटत आहे. मला अजून बरीच वर्षे खेळायचे आहे, असे रोहितने नाणेफेकीदरम्यान बोलताना म्हटले.

दरम्यान, श्रीलंकेचा संघ भारत दौऱ्यावर टी-२०नंतर कसोटी मालिका खेळणार आहे. यांसाठी श्रीलंकेचा संघ जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये काही खेळाडूंचे पुनरागमन झाले आहे, तर नव्या नावांचाही संघात समावेश करण्यात आला आहे. निरोशन डिकवेला आणि कुसल मेंडिस संघात परतले आहेत. वांडरसेचा प्रथमच संघात समावेश करण्यात आला आहे.



# संजय भोपी प्रीमियर लीग

## सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संजय भोपी सोशल क्लब, मॉर्निंग योगा ग्रुप, खांदा कॉलनी बॅटमिंटन क्लब व अलर्ट सिटीझन फोरम खांदा यांच्या संयुक्त विद्यमाने खांदा कॉलनीमध्ये ४० वर्षांवरील क्रिकेटपटूंसाठी संजय भोपी प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. २७) झाले.

खांदा कॉलनी क्रिकेट असोसिएशनच्या सहकार्याने दरवर्षी खांदा कॉलनीतील ४० वर्षांवरील क्रिकेटपटूंसाठी खांदा कॉलनी प्रीमिअर लीग ४०+ ही स्पर्धा भरविण्यात येते. यंदाच्या वर्षापासून ही स्पर्धा नगरसेवक स्व. संजय भोपी यांच्या स्मरणार्थ संजय भोपी प्रीमियर लीग या नावाने खेळविण्यात येणार आहे.

स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास भाजप युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, भाजप नेते भीमराव पोवार, युवा मोर्चा खांदा कॉलनी अध्यक्ष अभिषेक भोपी, परेश म्हात्रे, आदेश ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, क्रिकेटपटू उपस्थित होते.

# पनवेल तालुका क्रीडा संकुलात विविध स्पर्धा

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील तालुका क्रीडा संकुलात मनीषा मानकर यांच्या माध्यमातून खो-खो, हॅण्डबॉल आणि कबड्डी स्पर्धा शनिवारी (दि. २६) आयोजित करण्यात आली होती. ही स्पर्धा ५ ते १० वयोगटातील खेळाडूंसाठी घेण्यात आली. या स्पर्धेला भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत आयोजकांचे कौतुक केले.

या वेळी पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक नितीन पाटील, मनोहर म्हात्रे, तालुका क्रीडा संकुल येथील हॅण्डबॉल कोच प्रशांत महल्ले, संगम दंगर, मनीषा मानकर, अस्मिता मगर आदी उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून विविध क्षेत्रांत अनेक संधी उपलब्ध झाल्या असून त्यांच्या नेतृत्वाखाली देशात परिवर्तन घडत आहे, असे म्हटले.









### सुशांत मोहिते प्रीमियर लीग

**पनवेल : भाजप युवा नेते स्व. सुशांत मोहिते यांच्या स्मरणार्थ पनवेल रोहिदासवाडा यांच्या वतीने सुशांत मोहिते प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा मार्केट यार्ड येथील मैदानात सुरू असून महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या स्पर्धेला रविवारी भेट दिली. या वेळी बाब्या जाधव, निलेश जाधव, शुभंम मोहोकर, निकेतन लवांगे, तानाजी झुगे, तुषार सपांगे, अतुल विधाते, विलास गायकवाड, समीप मोहोकर, ओमकार कोल्हे, गजानन जाधव, ओमकार पाथरे, लक्ष्मण वावा, निलेश वावा, साईनाथ पाटील, साहिल भोसकर उपस्थित होते.**



**पनवेल : आदेश स्पोर्ट्सच्या वतीने शिवाजीनगर येथे सभागृह नेता चषक २०२२ या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. श्री छत्रपती शिवाजी महाराज मैदानात सुरू असलेल्या या स्पर्धेला महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी रविवारी भेट दिली. आयोजकांनी त्यांचे स्वागत केले. या वेळी किशोर पाटील, गजानन ठाकूर, विजय ठाकूर, प्रल्हाद भगत, किशोर ठाकूर, सुजित ठाकूर, अमित कडू, सुदीप ठाकूर, मयूर ठाकूर, पंकज मोकल, अभिजित ठाकूर, राहुल ठाकूर, दिपेश ठाकूर, शशिकांत कडू, सागर ठाकूर, जितेंद्र कडू, शुभम ठाकूर, प्रमोद ठाकूर आदी उपस्थित होते.**



**पनवेल : हार्ड हिटर्सच्या माध्यमातून हार्ड हिटर्स ट्रॉफी टर्फ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन सुकापूर येथील सॉकर सीटी टर्फ मैदानात करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी झाले. या वेळी नगरसेवक नितीन पाटील व अन्य मान्यवर उपस्थित होते.**


॥ ५२वे पुण्यस्मरण ॥

“सर्व काही असूनही, काहीच नसल्यासारखे आहे...
सर्व सुखांनी भरलेले हे कुटुंब, आपल्यावाचून अपुरे आहे...
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली”



कै. हरि काना ठाकूर

आपले विनीत

श्री. रामशेठ ठाकूर
श्री. काना हरि ठाकूर
श्री. अरुण हरि ठाकूर
सौ. तुळसाबाई गो. घरत आणि
ठाकूर परिवार, पनवेल.





दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com